महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका -२०१७
मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक
यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/मनपा -२०१७/प्र.क्र. ३/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०१७

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,बृहन्मुंबई,ठाणे,उल्हासनगर,पुणे,
पिंपरी-चिंचवड,सोलापूर, नाशिक,अकोला,अमरावती,नागपूर,
भिवंडी-निजामपूर,मालेगाव,लातूर, परभणी,चंद्रपुर व पनवेल

विषय:- **महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०१७**
**मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.३६/का.७ दिनांक ०२ जानेवारी, २०१७

महोदय/महोदया,

आपणास ज्ञात आहे की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची असून पर्यायाने ती आयोगाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यांची आहे.

२. सबब, निवडणूक कालावधीत सर्व स्तरावर (प्रामुख्याने निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष) सर्व कामे नियमानुसार होत आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी गेल्या अनेक निवडणुकांपासून स्वतंत्र निवडणूक निरीक्षक नेमण्याची पध्दत राज्य निवडणूक आयोगाने सुरु केलेली आहे.

३. मतदारांना प्रभावित करण्यासाठी राजकीय पक्ष व उमेदवार अनेक कल्पक युक्त्यांचा वापर करून पैसा, मद्य व इतर वस्तूंचे वाटप करतात असे काही निवडणुकांमध्ये लक्षात आल्यावर त्यांच्यावर बंधन आणण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाने अनेक उपाययोजना सुरु केल्या आहेत. उदा. खर्चासाठी विशेष निरीक्षकांची नियुक्ती, भरारी पथक (Flying Squad), व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक, इत्यादी.

४. भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील खर्चावर नियंत्रण ठेवणे व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनास आळा बसविणे आवश्यक आहे.

५. म्हणून वरील व इतर सर्व बाबींचा (खर्च, प्रलोभन इत्यादी) विचार करुन महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता निवडणूक निरीक्षकांबाबत नव्याने आदेश निर्गमित करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

६. **आदेश**

६.१ राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.३६/का.७, दि.०२ जानेवारी, २०१७ अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक नेमणेबाबत दिलेल्या सूचनांनुसार पुढीलप्रमाणे निरिक्षक नेमावयाचे आहेत.

(I) "अ+" व "अ" वर्ग महानगरपालिके मध्ये प्रत्येक २ निवडणूक अधिकाऱ्यांकरीता १ अपर जिल्हाधिकारी किंवा अन्य विभागातील समकक्ष दर्जाचा अधिकारी निवडणूक निरीक्षक.

(II इतर महानगरपालिकेमध्ये ("ब","क",व "ड" वर्ग) प्रत्येक २ ते ३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकरीता १ अपर जिल्हाधिकारी किंवा अन्य विभागातील समकक्ष दर्जाचा अधिकारी निवडणूक निरीक्षक.

तरी यासंदर्भात विभागीय आयुक्त यांनी उपरोक्त पत्रातील सूचना विचारात घेऊन कार्यवाही करावी.

६.२ प्रत्येक महानगरपालिकेमध्ये वरीलप्रमाणे नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांवर नियंत्रण व मार्गदर्शनकामी एक मुख्य निवडणूक निरीक्षक यांची नेमणूक करण्यात येईल. याबाबतचे स्वतंत्र आदेश राज्य निवडणूक आयोगाकडून काढण्यात येतील.

७. आयुक्त महानगरपालिका यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांचे नाव, पद, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, भेटीचा दिनांक, भेटीच्या दरम्यान राहण्याचे ठिकाण इत्यादी तपशिल क्षेत्रातील मतदारांच्या माहितीकरिता जाहीर सूचनेव्दारे (स्थानिक वृत्तपत्रात) प्रसिध्द करावा..

८. मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांनी निवडणुकीच्या काळात (नामनिर्देशनापासून निकाल लागेपर्यंत) त्यांना नेमून दिलेल्या निवडणूक प्रभागांना वेळोवेळी भेटी देऊन सर्व आवश्यक बाबींवर लक्ष ठेवावे. उदा :-

८.१ **सर्व व्यवस्था -**

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५ तसेच पत्र क्र.रानिआ/ मनपा-२०१६ /प्र.क्र.४/का.५, दिनांक ०९/०३/२०१६ व पत्र क्र.रानिआ/ मनपा-२०१६ /प्र.क्र.१६/का.५, दिनांक ०३/१२/२०१६ नुसार मतदान केंद्राबाबतचे सर्व निकष योग्यरित्या पाळून मतदान केंद्राची निश्चिती करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासणे,

(ii) सर्व मतदान केंद्रे सुस्थितीत आहेत किंवा कसे हे तपासणे,

(iii) सर्व मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे हे तपासणे, उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाण्याची सोय, वीज, रॅम्प, इत्यादी.

(iv) निर्वाचक अधिकारी यांचेकडून संवेदनशील-अतिसंवेदनशील मतदान केंद्राची यादी प्राप्त करुन घेवून सदर केंद्राना भेट देणे,

(v) निवडणूक प्रक्रिया योग्यरितीने पार पाडण्यासाठी आवश्यक (राखीव कर्मचाऱ्यांसह) अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमण्यात आला आहे किंवा कसे हे तपासणे,

(vi) आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासणे,

(vii) प्रशिक्षणाच्या तारखा, वेळ व स्थळ याची माहिती घ्यावी तसेच प्रशिक्षणाची व्यवस्था देखिल तपासावी.

(viii) सर्व संबंधित विभाग व यंत्रणा यांच्या सोबत योग्य तो समन्वय साधण्यात आला आहे किंवा कसे हे तपासावे, (उदा. गृह विभाग, उत्पादन शुल्क, आयकर, सेल्स टॅक्स, बँक, विद्यापीठे, प्रादेशिक परिवहन, इत्यादी.)

(ix) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था व मत मोजणीकरिता योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे हे तपासावे.

८.२ **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना-**

(i) मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व संबंधित विभाग व संस्था यांची मदत घेण्यात येत आहे किंवा कसे? (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, अशासकीय संस्था व उद्योग समूह, बँका, हॉटेल्स, रेस्टॉरंट, गृह निर्माण संस्था इ.) याची माहिती घ्यावी.

(ii) मोठ्या प्रमाणावर योग्य रितीने जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे किंवा कसे? याची माहिती घ्यावी.

(iii) अति कमजोर/असुरक्षित विभाग निश्चिती (Vulnerable Mapping) नुसार विशेषत: आदिवासी विभागात विश्वास निर्माण करणेसाठी (Confidence building) पोलिस व निर्वाचक अधिकाऱ्यांची अशा जागांना भेट झाली आहे का ते तपासावे. आवश्यकतेनुसार स्वत: भेट दयावी.

८.३ **राजकीय पक्ष व उमेदवार यांनी करावयाच्या खर्चावर नियंत्रण व आचारसंहिता -**

आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसोबत खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंचे वाटप इत्यादींवर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे? उदा.

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "निवडणूक संनियंत्रण समिती"ची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे? तसेच या समितीच्या बैठका आवश्यकतेप्रमाणे घेण्यात येते वा कसे?

(ii) समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करुन कार्यवाही केली आहे किंवा कसे? उदा :-

(अ) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ब) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(क) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(ड) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(इ) तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचे व्यवहार व हालचालींवर लक्ष ठेवणे.

(फ) बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(ग) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१/ का-५, दिनांक १६/०१/२०१२ नुसार पेड न्यूजबाबतच्या समितीच्या कामाचा आढावा घेणे. त्याचबरोबर सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

(iii) वरील बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या किंवा कसे? उदा.-

(अ) आवश्यकतेनुसार व्हिडिओग्राफी करणे व ती तपासण्याकरिता समित्या नेमल्या आहेत का ? (Video Surveillance Team, Video Viewing Team)

(ब) भरारी पथकाची स्थापना (Flying Squad) केली आहे का ?

(क) चेकपोस्ट साठी Static Surveillance Team नेमली आहे का ?

(ड) तक्रार निवारण कक्षाची स्थापना केली आहे का ?

८.४ निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणूका होण्यासाठी इतर सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे ?

८.५ प्रचारासाठी देण्यात येणाऱ्या परवानग्यामध्ये निवडणुकीमधील सर्व पक्ष व उमेदवार यांना एकसमान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे किंवा कसे ? (उदा. टी.व्ही., रेडिओ, होर्डिंग्ज, वर्तमानपत्रे, इत्यादी)

९. मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांनी त्यांना देण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी ६ दिवस भेटी व ६ रात्री मुक्काम करून योग्य ती कार्यवाही करावी.

(i) उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या आदल्या दिवशी (पूर्वसंध्येस) मुक्काम करावा व उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या कार्यवाहीवर लक्ष ठेवावे. (१ रात्र + १ दिवस)

(ii) मतदानापूर्वी, प्रचारादरम्यान कमीत कमी दोन दिवस, तीन रात्री मुक्काम करणे. (३ रात्री + २ दिवस)

(iii) मतदानापूर्वी दोन दिवस आधीपासून मतदानाच्या दिवसापर्यंत (२ रात्री + २ दिवस),

(iv) मतमोजणीच्या दिवशी (१ दिवस)

१०. ज्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक दोन्ही असतील तेथे कामाचे वाटप व भेटीचे वेळापत्रक मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी करावे.

११. निवडणूक निरीक्षक यांनी प्रत्येक भेटीच्यावेळी केलेल्या निरीक्षणाचा अहवाल (परि. १ ते ४ प्रमाणे ) संबंधित मुख्य निवडणूक निरीक्षक यांना सादर करावा. तसेच मुख्य निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निरीक्षकांकडून प्राप्त अहवालावर स्वतंत्र अभिप्राय दयावेत व त्यांनी स्वत: दिलेल्या भेटीचा

अहवाल स्वतंत्रपणे राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा. सदरचे परिशिष्टांव्यतिरिक्त अतिरिक्त माहिती द्यावयाची झाल्यास ती वेगळ्या पृष्ठावर मुद्देनिहाय सादर करावे.

१२. मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-५ प्रमाणे राहतील. तसेच निवडणूक निरीक्षकांकरिता महानगरपालिका आयुक्त यांनी उपलब्ध करुन द्यावयाची माहितीची तपासणी सूची सोबत जोडली आहे. निवडणूक निरीक्षकांना नेमून दिलेल्या प्रभागांशी निगडीत सर्व आवश्यक ती माहिती दर्शविणारे Observer Book तयार करुन दयावे. यामध्ये तपासणी सुचीतील सर्व मुद्दयांबाबत माहिती असावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(एस.एम. चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-
सर्व विभागीय आयुक्त,

C:\Users\atul.jadhav\Desktop\Corporation Revised २.docx

| |
|---|
| मतदानाचा दिनांक- ................. |
| उमेदवारांची यादी अंतिम |
| होण्याचा दिनांक - ........ |
| रात्री मुक्काम दिनांक- ..................... |

परिशिष्ट-१

## निवडणूक निरीक्षक यांचा पहिला अहवाल

(उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या आदल्या दिवशी (पूर्वसंध्येस) मुक्काम करून यादी अंतिम होण्याच्या कार्यवाहीवर लक्ष ठेवण्याबाबत- १ रात्र + १ दिवस)

महानगरपालिकेचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ.क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| १ | (i) एकूण किती नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती ?<br>(ii) अंतिमरित्या स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रांची संख्या ?<br>(ii) नामनिर्देशनपत्रे शपथपत्रांसह संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात आली किंवा कसे? | |
| २ | (i) छाननीमध्ये किती नामनिर्देशनपत्रे फेटाळण्यात आली ?<br>(ii) नामनिर्देशन नाकारल्याबद्दल लेखी तक्रारी प्राप्त झाल्या असल्यास त्यांची संख्या (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या अपिलांची संख्या | |
| ३ | निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडील नामनिर्देशनपत्रांच्या छाननीबाबत तक्रारी आहेत किंवा कसे ? | |
| ४ | उमेदवारी मागे घेण्याच्या आदल्या दिवशी (दि..........) रात्री महानगरपालिका क्षेत्रामध्ये गस्त घालून संशयास्पद ठिकाणी भेटी दिल्या किंवा कसे, अशा ठिकाणांची संख्या व तपशील | |
| ५ | त्या दिनांकास कोणत्या प्रकारच्या अनपेक्षित / आक्षेपार्ह अशा घटना निर्दशनास आल्या किंव कसे ? आल्या असल्यास त्याचा तपशील | |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत किंवा कसे, त्याचा तपशील | |
| ७ | निवडणूक निरीक्षकांच्या भेटीबद्दल<br>(i) प्रसिध्दी देण्यात आली होती किवा कसे | |

| | | |
|---|---|---|
| | (ii) तक्रारी, निवेदने देण्याबाबत सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात आली होती किंवा कसे ?<br>(iii) तक्रार निवारण कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(iv) आचारसंहितेच्या अंमलबाजवणीबाबत जनतेकडून प्राप्त तक्रारींचे निवारण होईल याबाबत जनतेस आश्वस्त करण्याकरिता केलेल्या उपाययोजना<br>(v) त्यांच्याशी संवाद साधून माहिती घेतली किंवा कसे ? | |
| ८ | उमेदवारी मागे घेण्याच्या आदल्या रात्री गस्तीच्या कालावधीमध्ये अनधिकृत मद्य वाटप, पैसे वाटप किंवा मोफत वस्तू वाटप इ. चे प्रसंग आढळून आले किंवा कसे ? (असल्यास त्यांची संख्या व तपशील)<br>स्टॅटीक सर्वेलन्स टीम व भरारी पथक यांच्याबाबत माहिती घेतली किंवा कसे,<br>रोख रकमा, तारण, इ.बाबत बँकासोबत बैठका घेण्यात आल्या होत्या किंवा कसे ? | |
| ९ | संबंधित यंत्रणांकडून सर्व प्रकारची माहिती घेण्याबाबत तजवीज केलेली आहे किंवा कसे ?<br>(i) आचारसंहिता भंग, पेड न्यजू, मद्यवाटप याबाबत सर्वसाधारण जनतेकडून तक्रारी किंवा सूचना प्राप्त झाल्या किंवा कसे, त्यांची संख्या व तपशील<br>(ii) निवडणूक संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे?<br>(iii) या समितीच्या किती बैठका घेण्यात आल्या आहेत ?<br>(iv) संनियंत्रण समितीने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यात माहिती (मुद्दा क्र.९.३)<br>(v) जिल्हास्तरावरील शस्त्रास्त्र छाननी समितीने केलेली कार्यवाही<br>(vi) पेड न्यूज समितीची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(vii) राजकीय पक्षांची बैठक घेण्यात आली आहे किंवा कसे ?<br>(viii) राजकीय पक्षांना निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात आले आहे किंवा कसे | |
| १० | आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी बाबतचे अभिप्राय | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

| |
|---|
| मतदानाचा दिनांक- .................. |
| प्रचाराचा कालावधी - दि. .......... ते दि. .......... |
| भेटीचा कालावधी - दि. .......... ते दि. .......... |
| रात्री मुक्काम दिनांक- ...................... |

## परिशिष्ट-२

## निवडणूक निरीक्षक यांचा दुसरा अहवाल

(मतदानापूर्वी प्रचारा दरम्यान कमीत कमी २ दिवस व ३ रात्री मुक्काम करून प्रचार मोहिमेवर लक्ष ठेवण्याबाबत)

महानगरपालिकेचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ. क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| | **प्रचार मोहीम** | |
| १ | कोणकोणत्या ठिकाणी भेटी दिल्या व त्या ठिकाणी किती वेळ उपस्थित होता ? | |
| २ | तक्रारींचे निवारण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या ? उदा :-<br>(i) कक्ष<br>(ii) तक्रार निवारण अधिकारी<br>(ii) इतर | |
| ३ | महानगरपालिकेचे स्तरावर पोलीस, दारुबंदी, अधिक्षक, वाहतूक अधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्यात आली का ? | |
| ४ | स्थानिक पोलीस अधिकारी यांनी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांचा तपशील | |
| ५ | आदर्श आचारसंहितेच्या भंगासंदर्भात गंभीर तक्रारी आल्या असल्यास त्याचा थोडक्यात तपशील व परवानगी न घेता प्रचार मिरवणूक, प्रचार सभा झाल्या का ? झाल्या असल्यास त्यावर काय कार्यवाही करण्यात आली ? | |
| ६ | प्रचार कालावधीत "सोशल मिडीया सेल" स्थापन करुन सोशल मिडीयाद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचाराची तपासणी व कारवाई होत आहे काय ? याबाबत तक्रारीची तालुकानिहाय संख्या नमूद करावी ? | |
| ७ | पेड न्यूजसंबंधात यंत्रणा कार्यान्वित आहे काय? वर्तमानपत्रातील बातम्यांची तपासणी झाली आहे किंवा कसे ? अशा बातम्यांची संख्या | |
| ८ | दौऱ्यादरम्यान सार्वजनिक मालमत्तेवर प्रचार साहित्य लावलेले आढळून आले काय ? असल्यास कार्यवाहीसंदर्भात दिलेल्या सूचना व केलेल्या कार्यवाहीचा | |

| | | |
|---|---|---|
| | तपशिल नमूद करावा. | |
| ९ | आचारसंहिता भंगाच्या किती तक्रारी निवडणूक निरीक्षक या नात्याने आपल्याकडे प्राप्त झाल्या का? याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा थोडक्यात अहवाल. | |
| १० | मतमोजणी केंद्र, स्ट्रॉंग रुम, मतदान साहित्य वाटप व स्वीकार केंद्र, इत्यादींची व्यवस्था काय असेल याचा आढावा घेतला काय ? | |
| | **प्रशिक्षणाबाबत** | |
| ११ | कोणकोणत्या प्रशिक्षण केंद्रांना भेटी दिल्या ? प्रशिक्षण व प्रशिक्षणार्थींची संख्या व स्वरुप (Hands on Training देण्याची व्यवस्था होती का?) | |
| १२ | (i) एकूण किती प्रशिक्षणार्थी होते व त्यापैकी किती अनुपस्थित होते ?<br>(ii) अनुपस्थित प्रशिक्षणार्थीवर तात्काळ कारवाई करण्यात आली किंवा कसे ? | |
| १३ | पुरेसे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी उपलब्ध होते किंवा कसे? | |
| १४ | सर्व आवश्यक मुद्दयांवर योग्य प्रशिक्षण देण्यात आले किंवा कसे? उदा.-<br>(i) मतदान केंद्र स्थापना<br>(ii) मतदान यंत्राचा वापर व प्रात्यक्षिक<br>(iii) तक्रारी / आचारसंहिता उल्लंघन / कायदा व सुव्यवस्था इत्यादी प्रसंग हाताळण्याबाबतचे मार्गदर्शन, इत्यादी<br>(iv) मतमोजणी | |
| १५ | सर्व मतदान केंद्रे शासकीय इमारतीत आहेत किंवा कसे, त्यांची संख्या | |
| १६ | सुव्यवस्थित मतदान केंद्र, शौचालय, पिण्याचे पाणी, अखंडीत वीज सेवा, रॅम्प याबाबत | |
| १७ | वाहनांची संख्या (सरकारी, खाजगी, भाडेतत्वावर) | |
| १८ | ईव्हीएम ठेवण्याकरिता स्ट्रॉंगरुमची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे ? | |
| १९ | मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता करण्यात आलेली उपाययोजना (विद्यापीठे, महाविद्यालये, बँका, रेस्टॉरंट इ.ची मदत घेण्यात आली असल्यास त्यांची संख्या) | |
| २० | मतदान टक्केवारी वाढविण्याकरीता केलेल्या प्रचाराबाबतचे पोस्टर, बॅनर इ. योग्यरितीने आढळून आले आहेत किंवा कसे ? त्यांची संख्या | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

| |
|---|
| मतदानाचा दिनांक- ................. |
| प्रचार कालावधी - दि. .......... ते दि. ......... |
| भेटीचा कालावधी - दि. .......... ते दि. .......... |
| रात्री मुक्काम दिनांक- ...................... |

## परिशिष्ट-३

### निवडणूक निरीक्षक यांचा तिसरा अहवाल

( मतदानापूर्वी २ दिवस आधीपासून मतदानाच्या दिवसापर्यंत- २ दिवस + २ रात्री )

महानगरपालिकेचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ. क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| | मतदानापूर्वी ( २ दिवस पूर्व रात्र ) | |
| १ | मतदान यंत्रे तयार करण्याच्या प्रक्रियेची तपासणी | |
| २ | मतदान यंत्रे मतपत्रिका लावून तयार करण्याचे स्थळ | |
| ३ | मतदान यंत्रे तयार करण्यासाठी राजकीय/मतदान प्रतिनिधी उपस्थित होते काय ? असल्यास दोन प्रतिनिधींची नावे, पक्ष व मोबाईल क्रमांक नमूद करावीत. | |
| ४ | तयार केलेल्या मतदान यंत्राची सिलींग प्रक्रिया व्यवस्थित पार पाडली आहे काय ? मतदान केंद्रनिहाय तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्राबाबतची नोंद विशेष रजिस्टरमध्ये ठेवण्यात आली आहे का ? | |
| ५ | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी १०% मतदान यंत्रे स्वत: तपासली आहेत काय ? | |
| ६ | निवडणूक निरीक्षक यांनी ५ मतदान यंत्रांची कोणत्याही (Random checking) तपासणी करुन ती व्यवस्थित काम करीत असल्याबाबत अहवाल द्यावा. | |
| ७ | (i) एकूण मतदान केंद्रांची संख्या<br>(ii) प्रत्यक्ष वापरात येणाऱ्या मतदान यंत्रांची संख्या (CU व BU)<br>(iii) तक्रारी / आचारसंहिता उल्लंघन / कायदा व सुव्यवस्था इत्यादी प्रसंग हाताळण्याबाबतचे मार्गदर्शन, इत्यादी | |
| | मतदानाचा दिवस (पूर्व रात्र) | |
| ८ | मतदानाच्यादिवशी कोणकोणत्या मतदान केंद्रांना भेटी दिल्या ? | |
| ९ | मतदान केंद्रावर मतदारांसाठी सर्व सोई-सुविधा उपलब्ध होत्या किंवा कसे ? उदा :- | |

| | | |
|---|---|---|
| | (i) रॅम्प<br>(ii) पिण्याचे पाणी<br>(iii) प्रसाधनगृहे, इत्यादी. | |
| १० | (i) मतदान केंद्रावर उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी होते का ?<br>(ii) मतदान सुरु होण्यापुर्वी मॉकपोल घेण्यात आला होता वा कसे, (मतदान केंद्राध्यक्षाचे घोषणापत्र तपासून)<br>(iii) मतदान केंद्रावर रांगा होत्या किंवा कसे ?<br>(iv) मतदान केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस बळ उपलब्ध होते का ?<br>(v) मतदान यंत्रे सुरळीत सुरु होती किंवा कसे, मतदान यंत्र बदलण्यात आल्यासंदर्भातील घटना | |
| ११ | (i) मतदानादरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील<br>(ii) भेटीच्यावेळी कोणकोणते झोनल अधिकारी भेटले ? | |
| १२ | मतदान प्रक्रिया संपल्यानंतर उपस्थित असणाऱ्या स्वीकार केंद्राचा तपशिल, सर्व मतदान केंद्रावरील मतदान साहित्य स्वीकार केंद्रावर सुरक्षित प्राप्त झाले किंवा कसे ? | |
| १३ | मतदान यंत्रे ठेवण्याची स्ट्राँग रुम सुस्थितीत असल्याबाबत खात्री केली आहे काय ? | |
| १४ | राजकीय प्रतिनिधींसमोर स्ट्राँग रुममध्ये मतदान यंत्रे ठेवली गेली काय? | |
| १५ | यावेळी उपस्थितीत २ प्रतिनिधींची नावे, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावेत. | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

C:\Users\atul.jadhav\Desktop\Corporation Revised २.docx

मतमोजणीचा दिनांक- ..................
भेटीचा कालावधी - . .......... ते .........

परिशिष्ट-४

## निवडणूक निरीक्षक यांचा चौथा अहवाल

( मतमोजणी - १ दिवस)

महानगरपालिकेचे नाव :
निवडणूक निरीक्षकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्रमांक :
छाननीचा दिनांक:

| अ. क्र. | विषय | निवडणूक निरीक्षकांचा अहवाल |
|---|---|---|
| १ | (i) मतमोजणीच्यावेळी कोणकोणत्या केंद्रांना भेटी दिल्या ?<br>(ii) मतमोजणीच्या ठिकाणी किती टेबल लावण्यात आली होती ?<br>(iii) निकाल पत्रकारांना मिळण्याकरिता सुविधा होती का ? | |
| २ | सर्व मतमोजणी केंद्रावरील मतमोजणी प्रक्रिया योग्यरित्या पार पाडण्यात आली किंवा कसे ? | |
| ३ | मतमोजणी सुरु झाल्यानंतर तहकूब करावी लागल्यास त्यासंदर्भातील घटना | |
| ४ | मतमोजणी दरम्यान एखादी गंभीर तक्रार आली असल्यास त्याचा थोडक्यात तपशील | |
| ५ | मतमोजणीनंतर काढता येणाऱ्या मेमरी कोषागारात ठेवण्याकरिता करण्यात आलेली व्यवस्था. | |

दिनांक:

ठिकाण :

निवडणूक निरीक्षकांची सही

<u>परिशिष्ट - ५</u>

# निवडणूक निरीक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना

निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक रितीने पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांची आहे. मात्र, आवश्यक ती सर्व उपाययोजना महानगरपालिका आयुक्त, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून केली जाते किंवा नाही, याची राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने तपासणी करणे ही निवडणूक निरीक्षकाची जबाबदारी राहील. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सिध्दांताप्रमाणे व राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निरीक्षकांनी योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. त्यांचे काम प्रभावीपणे करणेकामी खालील बाबी केवळ उदाहरण दाखल नमूद करण्यात येत आहेत:-

(१) निवडणूक निरीक्षकांनी या निवडणुकीशी संबंधित सर्व कायदे, नियम व आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांचा अभ्यास करावा व त्यांचे तंतोतंत पालन होते की नाही, हे तपासावे. जसे की,

(i) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८

(ii) बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियमावली २००६

(iii) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ व त्या अंतर्गत निवडणूक नियम

(iv) निवडणूक चिन्ह वाटपाबाबतचे दिनांक ३१.०३.२००९ व २५.०२.२०१३ चे आदेश

(v) आचारसंहितेबाबतचे आदेश दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६

(vi) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरिताची माहितीपुस्तिका, इत्यादी.

(२) महानगरपालिकेची सर्व माहिती (उदा. हद्दी, प्रभाग, राजकीय परिस्थिती, मतदान केंद्रे, संवेदनशील मतदान केंद्रे, कायदा व सुव्यवस्था, दारुबंदी, निवडणूक साहित्य इत्यादी)

निवडणूक निरीक्षकांनी महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करुन व प्रत्यक्ष भेटी देऊन समजावून घ्यावी.

(३) निवडणुकीशी निगडीत होणाऱ्या महत्वाच्या बैठकांना निवडणूक निरीक्षकांनी शक्यतोवर व्यक्तिश: उपस्थिती रहावे जसे-

(अ) पोलिस आयुक्त/ पोलिस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी, अधिक्षक (दारुबंदी), शैक्षणिक अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, इत्यादींसमवेत बैठक.

(ब) राजकीय पक्षांसमवेत बैठक

(क) मिडीया कमिटी समवेत बैठक, इत्यादी

(४) या निवडणुकीमध्ये संगणक प्रणालीचा योग्य तो वापर करण्यात आला आहे किंवा कसे ? हे तपासावे. उदा.-

(i) सर्व नामनिर्देशनपत्रे व प्रतिज्ञापत्रे संगणक प्रणालीद्वारे भरण्यात आली आहेत किंवा कसे ? तसेच उमेदवारांसाठी Help Desk तयार करण्यात आले आहेत किंवा कसे ?

(ii) महानगरपालिका आयुक्त यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान केंद्राध्यक्षाशी संपर्क साधण्यासाठी योग्य ती उपाययोजना केली आहे किंवा कसे ? (उदा. मोबाईल ॲप्लिकेशन्स, वॉट्स ॲप,एसएमएस, ई-मेल इत्यादी)

(५) आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/एफएलसी/प्र.क्र.५/का.१२, दिनांक २३ एप्रिल, २०१५ च्या सूचनांप्रमाणे शेवटच्या क्षणाची वाट न पाहता उपस्थित असलेल्या सर्व ईव्हीएमची FLC वेळेपूर्वी करण्यात आली आहे किंवा कसे व सर्व ईव्हीएम स्ट्राँग रुममध्ये व्यवस्थितपणे ठेवण्यात आली आहेत किंवा कसे ?

(६) मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी कोणत्या नाविन्यपूर्ण उपाययोजना करण्यात आल्या याविषयाची माहिती घ्यावी.

(७) अतिकमजोर / असुरक्षित विभाग निश्चिती ( Vulnerable Mapping) नुसार विशेषत: आदिवासी विभागात विश्वास निर्माण करण्यासाठी (Confidence Building) पोलिस व निर्वाचक अधिकाऱ्यांची अशा जागांना भेट झाली आहे का ते तपासावे. आवश्यकतेनुसार स्वत: भेट द्यावी.

(८) निवडणूक निरीक्षक यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये कमीत कमी ६ दिवस व ६ रात्री भेट द्यावी. या भेटींच्या तारखांची त्यांनी योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(९) मतदान व मतमोजणीसाठी पुरेशा प्रमाणात कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्यात आला आहे किंवा कसे ? त्यांच्या प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली व्यवस्था. तसेच नेमण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे?

(१०) प्रशिक्षण देण्याची पध्दत योग्य आहे किंवा कसे, हे बारकाईने तपासावे, यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असावा:-

(i) मतदान केंद्राच्या व्यवस्थेबद्दल सर्व माहिती
(ii) ईव्हिएम हाताळणीबाबतची सर्व माहिती
(iii) मतदान दिनाच्या अहवाल (संविधानिक/असंविधानिक लिफाफे इ.) ची माहिती व्यवस्थितरितीने व वेळेवर पाठविण्यासाठी असलेली व्यवस्था; आयोगाकडून मतदानाची आकडेवारी संकलित करण्यासाठी काही ॲप्स उदा.True Voter Apps / Whatsapp चा वापर करणेबाबत सूचना दिल्या असल्यास त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
(iv) आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी
(v) निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांसाठी सर्व उपाययोजना, इत्यादी

(११) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, पोलीस विभागाकडून आवश्यक ते मनुष्यबळ, दारुबंदी सारख्या उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे, याची तपासणी करावी.

(१२) राजकीय पक्ष व उमेदवार यांनी करावयाच्या खर्चावर नियंत्रण व आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा कसे, याची तपासणी करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष द्यावे :-

(i) **जिल्हाधिकारी** यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे वा कसे ? तसेच या समितीच्या बैठका आवश्यकतेप्रमाणे घेण्यात येतात किंवा कसे ?

(ii) सर्व संबंधित विभाग व यंत्रणा यांच्यासोबत योग्य तो समन्वय साधण्यात आला आहे वा कसे हे तपासावे. (उदा. गृह विभाग, उत्पादन शुल्क, आयकर, विक्रीकर, बँका, विद्यापीठे, प्रादेशिक परिवहन, इत्यादी)

(iii) समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करुन कार्यवाही केली आहे किंवा कसे? उदा.-

(अ) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ब) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(क) अनधिकृत बांधकामे, अनधिकृत जाहिराती/फलक काढणे.

(ड) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(इ) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(फ) तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचे व्यवहार व हालचालींवर लक्ष ठेवणे.

(ग) बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(घ) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१/ का-५, दिनांक १६/०१/२०१२ नुसार पेड न्यूजबाबतच्या समितीच्या कामाचा आढावा घेणे. त्याचबरोबर सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

(iv) मतदारांना अप्रत्यक्षपणे प्रलोभन देण्यात आले होते किंवा कसे?

(v) वरील बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या किंवा कसे?

उदा.-

(अ) आवश्यकतेनुसार व्हिडिओग्राफी करणे व ती तपासण्याकरिता समित्या नेमल्या आहेत का ? (Video Surveillance Team, Video Viewing Team)

(ब) भरारी पथकाची स्थापना (Flying Squad) केली आहे का ?

(क) चेकपोस्ट साठी Static Surveillance Team नेमली आहे का ?

(ड) तक्रार निवारण कक्षाची स्थापना केली आहे का ?

(vi) प्रचारासाठी देण्यात येणाऱ्या परवानग्या निवडणुकीमधील सर्व पक्ष व उमेदवार यांना एकसमान संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे किंवा कसे (उदा. टी.व्ही. रेडिओ, होर्डिंग्ज, वर्तमानपत्रे, इत्यादी)

(१३) निवडणूक निरीक्षक यांनी त्यांच्या भेटींमध्ये मतदान केंद्रांची सुव्यवस्था व त्यावरील उपलब्ध सोयी-सुविधा तपासावी. तसेच संवेदनशील-अतिसंवेदनशील मतदान केंद्रांना विशेष भेट दयावी., ईव्हीएमसाठी तयार करण्यात आलेले स्ट्रॉंग रुम्स व मतमोजणीचे ठिकाण व त्यावरील सर्व व्यवस्था सुध्दा तपासावी.

(१४) मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान केंद्राध्यक्ष व अधिकारी यांना मतदान साहित्य वाटपासाठी केलेली उपाययोजना - उदा. वेगवेगळया टेबलांवरुन सुनियंत्रितरित्या मतदान साहित्य वाटप, मदत कक्ष, मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद व साहित्य रवाना करणेकामी करण्यात आलेली वाहन व्यवस्था तपासावी.

(१५) निवडणूक निरीक्षकांना त्यांच्या भेटींच्या वेळी व इतर वेळी काही गैरकृत्ये आढळून आल्यास व त्याचा विपरीत परिणाम निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांवर होण्याची शक्यता असेल तर त्याबद्दलची संपूर्ण माहिती त्वरीत संबंधित अधिकारी (जिल्हाधिकारी / पोलीस अधिक्षक) यांच्या

निदर्शनास आणावी आणि हे गैरकृत्य थांबविण्याबाबत सूचित करावे. तद्नंतरही गैरकृत्य थांबत नसेल तर त्याचा लेखी अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

(१६) निवडणूक निरीक्षकांनी त्यांच्या प्रत्येक भेटींच्यावेळी केलेल्या निरीक्षणाचा अहवाल त्याच दिवशी संबंधित मुख्य निवडणूक निरीक्षक यांना सादर करावा. तसेच मुख्य निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निरीक्षकांकडून प्राप्त अहवालावर स्वतंत्र अभिप्राय दयावेत व त्यांनी स्वत: दिलेल्या भेटीचा अहवाल स्वतंत्रपणे राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.

(१७) एखाद्या प्रभागामध्ये फेर मतदान झाल्यास त्यावेळीसुध्दा वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१८) मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांनी खालील बाबी कटाक्षाने टाळाव्यात :-

(i) निवडणूक क्षेत्राला भेटी देताना त्यांच्या कुटुंबियांसोबत जाऊ नये.

(ii) निर्वाचक अधिकाऱ्यांच्या निर्णयात फेर बदल करु नये. परंतु तो योग्यरित्या काम करतो आहे किंवा कसे याचे निरीक्षण करुन अहवाल सादर करु शकतो.

(iii) प्रसार माध्यमांशी बोलू नये अथवा मुलाखत घेवू नये.

(iii) अनावश्यक सोयी-सुविधांची मागणी करू नये.

(iv) राजकीय पक्षांच्या बैठका आपल्या स्तरावर आयोजित करु नयेत.

(१९) निवडणूका योग्यरितीने पार पाडल्यावर व सर्व अहवाल आयोगास सादर केल्यावर या आदेशाद्वारे देण्यात आलेली मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांची जबाबदारी पूर्ण होईल.

.......................................................................

## तपासणी सूची (Check list)

निवडणूक निरीक्षकांकरिता महानगरपालिका आयुक्त यांनी उपलब्ध करुन दयावयाची माहिती

**महानगरपालिकेचे नाव :-**

१. निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकाऱ्याची नावे व संपर्क क्रमांक :-

२. महानगरपालिका निवडणूक प्रभागाचे क्षेत्र व नकाशासह तपशील (निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय)

३. मतदान केंद्रांची एकूण संख्या व त्यापैकी निवडणूक निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मतदान केंद्रांची संख्या

४. निवडणूक निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रांचा तपशील

५. निवडणुकीकरिता आवश्यक असलेला अधिकारी/कर्मचारीवर्ग यांची संख्या

६. निवडणुकीकरिता आवश्यक असलेले निवडणूक साहित्य-

मतदान यंत्रे - पेपर सील - पट्टी सील -

स्पेशल टॅग - मार्कर पेन - काढत्या येणाऱ्या मेमरी-

बॅटरी - इतर आवश्यक महत्वाचे साहित्य -

७. मतदान यंत्रांची तपासणी -

८. साहित्य वाटप केंद्राची ठिकाण -
संकलन केंद्राचे ठिकाण -

मतमोजणी केंद्राचे ठिकाण

९. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता केलेली कार्यवाही -

C:\Users\atul.jadhav\Desktop\Corporation Revised २.docx

१०. आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीच्यादृष्टीने केलेली कार्यवाही -

११. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या बैठका -

१२. उमेदवारांचा निवडणूक खर्च तपासण्याकरिता केलेली उपाययोजना -

१३. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी इ.करिता आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण -

१४. मतपत्रिका छपाईकरिता केलेली व्यवस्था-

१५. स्ट्राँग रुम व्यवस्था -